PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chavhata
Year: 1984

Song: Moracha Dhang Asa
Lyricist: Jagdish Khebudkar

मोराचा ढंग असा
चाफ्याचा रंग असा गं...
मोराचा ढंग असा
चाफ्याचा रंग असा गं...

रूपाचा डौल कुठं मिळंल का
गं ...
मनाचा कौल तुझा कळंल का
मनाचा कौल तुझा कळंल का

अंग माझं रंग तूझा
एकांती संग तुझा आ...
अंग माझं रंग तूझा
एकांती संग तुझा आ...
गुणाचा डौल कुठं मिळंल का
रं...
अरे मनाचा कौल तूझा कळंल का
मनाचा कौल तुझा कळंल का

ही हिरवी हिरवी माया
ही नितळ गोरी काया गं
माझ्यावानी या धरतीला
निळी सावळी छाया रं
ही हिरवी हिरवी माया
ही नितळ गोरी काया गं
माझ्यावानी या धरतीला

निळी सावळी छाया
झुळझुळ पाण्यामंधी
लाटाच्या गाण्यामधी
सूराला सूर तुझा जूळंल का
सूराला सूर तुझा जूळंल का
आ.. मनाचा कौल तूझा कळंल का

मनाचा कौल तुझा कळंल का

हे लबाड असती डोळं
कुणी म्हणती माया जाळं गं
त्या नजरेला भूललं बाई
काळीज माझं भोळं रं
हे लबाड असती डोळं
कुणी म्हणती माया जाळं गं
त्या नजरेला भूललं बाई
काळीज माझं भोळं

पिरतीच देणं घेणं सुखाच लेवूलीण
कळलं तरी तूला वळंल का
कळलं तरी तूला वळंल का
आ.. मनाचा कौल तूझा कळंल का
मनाचा कौल तूझा कळंल का
ला ला ला
ला ला ला
ला ला ला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*